सेवक संघ महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष-२०२२

# सेवक वार्ता

सप्टेंबर-२०२२

वर्ष -३, अंक-११

कार्यालय - संत एकनाथ नगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७

## निधन वार्ता

**श्री.वाय.जी.जाधव साहेब,से.नि.वन महानिरीक्षक यांचे वृध्दापकाळाने दि.२०-०९-२०२२ रोजी सायंकाळी पुणे येथे निधन झाले. ईश्वर त्यांचे आत्म्यास शांती प्रदान करो. सेवक संघातर्फे त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.**



### अल्प परिचय

सन १९५२ मध्ये सहायक वन संरक्षक म्हणून अमरावती वनविभागात सेवेस सुरूवात. नागपूर, नाशिक येथे विभागीय वन अधिकारी व वनोपयोग अधिकारी पदावर कार्यरत होते. जुलै १९६६ ते मे १९६७ दरम्यान युनोच्या FAO चे फेलोशीपवर अमेरिका व जर्मनी येथे औद्योगिक वानिकी व यांत्रिकी प्रकाष्ठ निष्कासन विषयी प्रशिक्षण. सिकॉम, मॅफको व विदर्भ विकास महामंडळावर प्रतिनियुक्तीने काही वर्षे सेवारत. राज्यात मुख्य वन संरक्षक (उत्पादन) व केंद्रात वन महानिरीक्षक पदावर कार्यरत होते. त्यांनी सन १९८८ मध्ये मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेतली.

## पाणलोट क्षेत्रात उपचार दिलेल्या ४६ स्थळांचे मूल्यांकन

सेवक संघाचे जेष्ठ सदस्य व अनेक कामांचे समन्वयक, मार्गदर्शक श्री. पत्की यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्रातील धुळे, ठाणे व नागपूर वनवृत्तातील पाणलोट क्षेत्रात उपचार दिलेल्या ४६ स्थळांचे (क्षेत्र-८७४ हेक्टर) मूल्यांकन करण्यासाठी काम मिळाले असून त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, कॅम्पा महाराष्ट्र, नागपूर याचेशी समझोता अभिलेख करणेत आला आहे. सेवक संघाचे वतीने श्री. एस. के. गवळी, उपाध्यक्ष यांनी समझोता अभिलेख स्वाक्षरीत केला. सदर कामासाठी ७ चमू गठीत करण्यात आले असून त्यात सर्वश्री एम. एम. कुलकर्णी, उमेश धोपेश्वरकर, ए. एस. खुणे , जयप्रकाश पाटील, बी. बी. जोमीवळे, बी. आर. छल्लारे, आर. जी. राणे, संजय पांडे, बी. बी. निकम, एन. आर. निकम यांनी सहभागासाठी होकार कळविला आहे. श्री. गवळी हे चमू प्रमुख व श्री. पत्की सर मार्गदर्शक म्हणून सेवक संघाचे या मोहिमेत सेवा देत आहेत.

कार्यारंभ आदेश लवकरच मिळणार आहेत.

## वन प्रबोधिनी, चंद्रपूर येथे वन विकास महामंडळ कर्मचारी व अधिका-यांसाठी प्रशिक्षण आयोजीत करण्यासाठी सेवक संघाची निवड

वन प्रबोधिनी,चंद्रपूर येथे ४ दिवसांचे कालावधीचे वन विकास महामंडळ कर्मचारी व अधिका-यांसाठी वन कायदे विषयक प्रशिक्षण आयोजीत करण्यासाठी सेवक संघाची निवड करण्यात आली आहे. दर महिन्यात एक प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात येत असून त्यात २५ प्रशिक्षणार्थी असणार आहेत. हे प्रशिक्षण ९ महिने चालणार आहे.

दि. २६-९-२२पासून सुरू असलेल्या शारदीय देवी नवरात्रौत्सव निमित्ताने सर्व सदस्य व परिवारास हार्दिक शुभेच्छा

## धुळे शाखा विशेष उपक्रम

***************************

**नंदुरबार वन विभाग सामुहिक वन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत अपडेट ......**

उप वन संरक्षक नंदुरबार वन विभाग यांचेकडून प्रायोगिक एकूण ५ गावांचे

### या अंकात.......

१. पाणलोट क्षेत्रात उपचार (CAT) कामाचे ठी मुलयांकन. . . . .. . . १
२. सामुहिक वन हक्क व्यवस्थापन आराखडे अपडेट . .. .. .. १
३ वन विकास महामंडळ कर्मचारी व अधिका-यांसाठी वन कायदे विषयक प्रशिक्षण. . .. १
४. निधन वार्ता. .. .. .. .. १
५. बिबट्या आणि माणूस संघर्ष – पर्यायी उपाययोजना लेखमाला . . . . . २

व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे कामाची प्रगती खालीलप्रमाणे आहे.

१)तोरणमाळ, बिलमांजरे, असली गावांचे व्यवस्थापन आराखडे जिल्हास्तरीय समितीची मंजूरी घेण्यासाठी उप वन संरक्षक, नंदुरबार यांच्याकडे सादर करणेत आले आहेत.

२) वाघाळे गावाचे सामुहिक वन हक्क आराखडा श्री. एम. कुलकर्णी व श्री धोपेश्वरकर चमू करीत आहे.

वन्यजीव सप्ताह कालावधीत धुळे शाखेच्या सदस्यांनी आपापल्या नजिकच्या शाळा, महाविद्यालय येथे वन्यजीव संवर्धन, संरक्षण, अधिनियम या सारख्या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्याने द्यावे असे आवाहन सेवक संघ धुळे शाखेच्या अध्यक्षांकडून करण्यात आले आहे. त्यासाठी शाळा महाविद्यालय येथे संपर्क साधावा व नियोजन करण्याबाबत विनंती केली आहे.

## अमरावती शाखा विशेष उपक्रम

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ,शाखा अमरावती सातत्याने पर्यावरणाशी संबंधित उपक्रम राबवत असते. भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षात एक अभिनव वृक्ष लागवड उपक्रम राबनवण्यात येत आहे. अमरावती शहर व लगतचे नूतनीकरण झालेल्या रस्त्यालगत प्रवासी निवारे बांधण्यात आलेत. सदर निवारे संपूर्ण लोखंडी आहेत. उन्हाळ्यात प्रवासी या प्रवासी निवाऱ्यात बसता ज्या निकाणी एखादा वक्ष असेल अशा ठिकाणी वाहि,बसची वाट बघत उभे राहतात असे

सर्व दूर चित्र निदर्शनास येते. सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ सदस्यांचे निदर्शनास ही प्रवासी अडचण आली. त्या दृष्टीने या वर्षी प्रायोगिक तत्वावर प्रवासी निवाऱ्याचे बाजूस स्थानिक पाच वृक्ष प्रजाती (वड,पिंपळ,उंबर,कडूनिंब,बकुळ) लागवड करण्यात आले. प्रथमत: एकूण पाच स्थळे निवडण्यात आलीत. सदर निकाणचे वृक्ष प्रेमी यांि लागवड केलेल्या वृक्षाचे संगोपन करण्याचे ठरविले. पर्यावरण पूरक बांबू ट्री गार्डसह पाच वृक्ष लागवड काही स्थानिक व्यक्तींच्या स्मृतीप्रीत्यर्थ करण्यात आली. यांस "पंचवटी वृक्ष लागवड" असे संबोधण्यात आले.

## कार्यकारी मंडळ बैठक वृत

**सेवक संघाचे अध्यक्षांचे उपस्थितीत दिनांक १३/९/२०२२ सकाळी ११:०० कार्यकारी मंडळाची मासिक आभासी सभा आयोजित करण्यात आली होती. सभेत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.**

**१: कॅचमेट क्षेत्रातील रोपवन मुल्यांकन कामाचा आढावा**

**२: दि. ३/१०/२०२२ रोजी कै एम जी गोगटे स्मृतीदिन कार्यक्रम आयोजित करण्या- बाबतचे नियोजन**

**३: कन्हारगाव अभयारण्य व्यवस्थापन आराखडाचा निधी वाटप**

**४: सन २०२१-२२ चा वार्षिक रोखलेखा अंतिमीकरण व कर भरणा (Income tax) बाबत.**

**५. ऐनवेळीचे उपस्थित विषय - सामुहिक वन व्यवस्थापन आराखडे तयात करणे**

******************************

## श्राध्द केले की, कावळ्यासच का खाऊ घातले जाते... या मागील शास्त्रीय हेतू जाणून घेऊया.

जगात प्रत्येक झाड हे प्राणवायुचे उत्सर्जन करत असते. पण केवळ "वड" व "पिंपळ" हे दोनच वृक्ष इतर झाडांपेक्षा एकाच वेळी दुपटीने सर्व मानवांसाठी व जीवांसाठी प्राणवायु उत्सर्जन करतात. हे शास्त्रज्ञांनी मान्य केलेले आहे. जगात सर्व झाडांची रोपे बीज प्रक्रियेद्वारा "मनुष्य" लाऊ शकतो. परंतु फक्त "वड" व "पिंपळ" या दोनच वृक्षांची प्रत्यक्ष बीज निर्मिती नाही. या दोन्ही झाडांची कोमल अंकुर स्वरूपात फळं जेव्हा फक्त "कावळे" खातात, (बघा त्यातही म्हटले आहे केवळ कावळेच, इतर कोणताही पक्षी नाही) तेव्हा त्यांच्या "पोटातच" ही प्रक्रिया सुरु होते आणि ते जेथे "विष्ठा" करतात तेथेच "वड" किंवा "पिंपळ" हे वृक्ष येतात. या कावळ्यांशिवाय ही झाडे टिकणार नाहीत व कावळ्यांचे अंडी घालणे (प्रजनन) हे फक्त "भाद्रपद" महिन्यातच होते. त्यामुळे त्यांना "घराघरातून" पोषक आहार या काळात प्रत्येक सु-संस्कारी" मानवांनीच दिला तरच हे सृष्टी चक्र व्यवस्थित चालेल हे पूर्वीच्या आपल्याच "संतांनी, शास्त्रकारांनी जाणले होते. आपल्या संस्कृतीतील "ऋषि-मुनि" हे अत्यंत बुद्धिमान आणि सखोल "विद्वान" होते. माणसांच्या आरोग्यासाठी ही "दोनच" झाडे अत्यंत उपयोगी व आवश्यक आहेत म्हणून या वृक्षांचे संवर्धन होण्यासाठी पोषक आहार कावळ्यांना देण्याची प्रथा सुरु करण्यात आली. आपली पूर्वापार चालत आलेली जीवनशैली ही पर्यावरणपुरक आणि शास्त्रावर आधारलेली आहे ! फक्त ती समजून घ्यायची आपली "कुवत" कमी पडते म्हणून आपण वेड्यासारखं "पितृपक्ष" आला की "कावळ्यावर" टुकार विनोद करून एकमेकाला पाठवण्यातच धन्यता मानतो. प्रत्येक प्रथेमागे जे विज्ञान आहे ते शोधण्याऐवजी त्यावर खिल्ली उडवणे यातच पुरोगामीपणा व अति-सुशिक्षितपणा ज्यांना वाटतो त्याची कीव करावीशी वाटते. ही तरी "कोरोनाने" मागे "ऑक्सीजन" बद्दलचे महत्त्व समाजाला पटवून दिलेच आहे. जर का कावळ्यांना घराघरातून "पितरांच्या" नावाने खायला नाही मिळाले , तर आपल्या मागील वंशाचे नातू-पणतूंचे काय हाल होतील याची कल्पना करा ? हे "वैज्ञानिक" स्पष्टीकरण वाचल्यावर आपले विचार बदलतील हीच माफक अपेक्षा.

## बिबट्या आणि माणूस संघर्ष – पर्यायी उपाययोजना - भाग २

*** प्रभाकर कुकडोलकर**



बिबटया हजारो वर्ष गावाला लागून असलेल्या वनक्षेत्रात सुखनैव जगत आला पण स्वातंत्र्यानंतर वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी आम्ही त्याच्या या नैसर्गिक अधिवासावर अतिक्रमण केले.माणसं, पाळीव जनावरं राजरोस या क्षेत्रात फिरत राहिली. लोकांनी बिबटयाचं भक्ष शिकार करुन संपवलं.पिण्याच्या पाण्यासाठीसुधा बिबटयाला संघर्ष करावा लागला. दरवर्षी वणव्यामुळे जंगलात बिबटयाला आणि त्याच्या पिलांना लपण्यासाठीसुद्धा जागा शिल्लक राहिली नाही. संयुक्त वन व्यवस्थापन योजने -अंतर्गत गावाचे वनक्षेत्र व्यवस्थापन करण्यासाठी आम्ही संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या ताब्यात दिले. आज राज्यातील ४५ टक्के वनक्षेत्र समित्यांच्या ताब्यात आहे. अनेक गावांत आता 'वन आमचे आहे तुमची गरज नाही'! असे स्थानिक लोकांनी वन रक्षकांना सुनावले. अपेक्षे प्रमाणे वन व्यवस्थापन झाले नाही तरी समितीकडून वनक्षेत्र पुन्हा ताब्यात घेण्याची हिंमत राजकीय हस्तक्षेपामुळे वरिष्ठ वन अधिकाऱ्यांनी दाखवली नाही.त्यामुळे व्हायचे तेच झाले. बिबटयांनी वनक्षेत्र सोडून सहज उपलब्ध झालेल्या उसाच्या शेतीचा आसरा घेतला. तिथे त्यांच्या सर्व गरजा भागत असल्याने ते आता तिथे स्थिरावत आहेत.

--उर्वरीत भाग पुढील अंकात..

**केवळ खाजगी वितरणासाठी**

प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र,पुणे

संपादन - एस. के. गवळी